मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक ८ • वर्ष १८ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट - २०२१

# हसती दुनिया
(मराठी)

अंक ०८ • वर्ष १८ वे • पृष्ठे ५२ • ऑगस्ट - २०२१

**बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट**

**(पंजाबी, इंग्रजी व हिंदी भाषेतसुध्दा प्रकाशित)**

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सजावट व चित्रे
स्वप्निल वि. ऱ्हाटवळ
राजनंदन कृ. पिंपळकर • श्रीकांत द. पाटील

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेस-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष ~~₹ 1500~~ |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९

## स्तंभ


- दोन शब्द ०४
- विचारपुष्प १०
- दादाला विचारु या १३
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २२
- शब्दकोडे १५
- आरोग्याचा मंत्र २२
- दिव्यवाणी २५
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- हसा मुलांनो हसा ३०
- सामान्य ज्ञान ४५
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३८

## विशेष व प्रेरक प्रसंग


- व्यक्तिविशेष ०८
- विशेष २७
- भ्रमंती ३२
- तेजस्विनी ३४
- समर्थ दर्शन -भाग ७६ ३६
- संतकथा ४२
- मत्स्यजगत ४८
- विश्वजगत ४९

## कथा


- मैत्रीची अशीही एक कथा ०५
- अटळ सत्य ०८
- तोडणं सोपं पण जोडणं कठीण ११
- उपकाराची परतफेड २०
- कर्ताभाव २८
- उन सावलीचा खेळ ४३
- चूक उमगली ४६

## कविता


- नेक बनू या २४
- वाटते मला... ३५

# खरं सौंदर्य

सुंदर असावं असं सर्वांनाच वाटतं. चांगल्या वस्त्र– आभूषणांनी देहाचं सौंदर्य वाढतं; परंतु चांगल्या कर्माने जीवनाचं सौंदर्य वाढत असतं. बाह्य सौंदर्य हे काही काळापर्यंतच टिकतं; परंतु आंतरिक सौंदर्य मात्र चिरकाल टिकणारं असतं आणि ते येतं केवळ सद्‌गुणांनी आणि सत्कर्माने!

आश्रमातील एका शिष्याला सोबत घेऊन गुरुदेव प्रवासाला निघाले. जाताना एक नगर लागलं. एकापेक्षा एक सुंदर इमारती, सुंदर बागा, खेळण्याची दुकानं, सुंदर सुंदर वस्तूंकडे कुतुहलाने बघत शिष्य गुरुदेवांसोबत चालला होता. पुढे गेल्यावर गुरुदेवांनी एका धर्मशाळेत रात्री मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी त्यांनी शिष्याकडे एक पत्र दिले आणि सांगितले की हे पत्र दहा कोसावर असलेल्या शेठजींना येऊन दे.

शिष्य मजल–दरमजल करत शेठजींकडे पोहचला. त्याला बघताच शेठजी स्वतः उठून पुढे आले. त्यांनी शिष्याचा हात धरुन त्याला आपल्या सोबत उंच आसनावर बसवले. त्याची विचारपूस केली. दुपारचे भोजन आपल्या सोबतच करण्याचा आग्रह केला. शिष्याला ते आग्रह करुन स्वतः वाढत होते. प्रेमाने खाऊ घातल्यानंतर त्यांनी त्याला प्रेमाने निरोप दिला.

धर्मशाळेत गुरुदेव शिष्याची वाट पाहतच होते. पुढे ते दोघे आश्रमाकडे यायला निघाले.चालता चालता गुरुदेवांनी विचारले,“ शिष्योत्तमा, या संपूर्ण प्रवासामध्ये तू काय काय पाहिलंस?” शिष्याने सांगितलं, की “सुंदर इमारती, बागा, दुकानं, विविध प्रकारच्या वस्तू, पुतळे पाहिले.”

गुरुदेवांनी पुढे विचारले,“ बरं मग या संपूर्ण प्रवासामध्ये तुझ्या कायमस्वरुपी लक्षात राहील अशी कोणती गोष्ट तू पहिलीस?”

शिष्य म्हणाला,“गुरुदेव! सुंदर वास्तू, इमारती, ह्या तर काही क्षण लक्षात राहतील; परंतु कायम लक्षात राहील अशी एकच गोष्ट मला अनुभवास आली ती म्हणजे धनवैभवाने संपन्न असलेल्या शेठजींच्या दीमतीला असंख्य नोकर चाकर असूनही त्यांचे माझ्याशी आपुलकीने वागणे त्यांचा विनम्र व्यवहार, तो माझ्या कायमस्वरुपी लक्षात राहील.”

गुरुदेव म्हणाले,“बाळ, हेच तर खरं जीवनाचं सौंदर्य आहे. बाहेरचं सौंदर्य काही काळापर्यंत लक्षात राहतं; परंतु माणसाचं कर्म, त्याचा सुंदर व्यवहार कायमस्वरुपी लक्षात राहतो.”

मित्रांनो, सुंदर दिसावं हे सर्वांनाच वाटतं; परंतु आपलं आचरण सुंदर असावं असं फार कमी जणांना वाटतं. जो या आंतरिक सौंदर्याकडे विशेष लक्ष देतो, त्याचंच जीवन सुंदर बनतं, तोच सर्वांच्या हृदयामध्ये स्थान मिळवतो.

- राजेंद्र थोरात

# मैत्रीची अशीही एक कथा

द्रुपद आणि द्रोण दोघे बालपणीचे मित्र होते. ते एकाच गुरुकुलात शिक्षण घेत होते. पुढे द्रुपद हा पांचाळ देशाचा राजा झाला. तर द्रोण हे गुरुकुलात आचार्य म्हणून मुलांना शिक्षण देऊ लागले. त्यांनी कौरव–पांडव यांना अस्त्र– शस्त्रांचे शिक्षण दिले.

कौरव–पांडव लहान असताना त्यांच्या गुरुकुलात शिक्षण घेत होते. त्यांच्यासोबतच त्यांचा मुलगा अश्वत्थामा हा देखील शिकत होता.

अश्वत्थामा लहान असतानाची ही घटना आहे. एकदा बाल अश्वत्थामा दुधासाठी हट्ट करु लागला. आश्रमात गायी नसल्याने दूध कुठून आणणार? गुरु माता कृपीने त्याला पिठात पाणी कालवून दिले

आणि ते पाणी दूध समजून तो आनंदाने प्यायला. ज्या ज्या वेळी तो दुधासाठी हट्ट करी तेव्हा कृपी त्याला पिठात पाणी घालून देत असे आणि तोही ते आनंदाने पीत असे.

कौरव पांडव हे राजपुत्र असल्याने त्यांनी दूध सेवन केलेले होते, तेव्हा ते अश्वत्थाम्याला म्हणाले, की हे दूध नाही, हे तर पिठाचं पाणी आहे. हे ऐकताच अश्वत्थाम्याला खूप वाईट वाटले. आपल्याला खरेखुरे दूध हवे असा त्याने हट्ट धरला; परंतु आश्रमात गाई नसल्याने दूध मिळणे शक्य नव्हते. गुरु द्रोणाचार्यांची पत्नी कृपी त्यांना म्हणाली,"राजा द्रुपद पांचाळ देशाचे सम्राट आहेत शिवाय ते तुमचे बालमित्रही आहेत. त्यांच्याकडून तुम्ही दोन गाई घेऊन या."

गुरु द्रोणाचार्यांना ही गोष्ट पटत नव्हती; परंतु पत्नीच्या आग्रहास्तव ते द्रुपद राजाला भेटायला गेले आणि दरबाऱ्याला त्यांनी निरोप दिला, की सम्राट द्रुपदांचा बालमित्र आला आहे .

राजा द्रुपद राजसिंहासनावर विराजमान होता, गुरु द्रोणाचार्यांना बघूनही तो त्यांना भेटायला पुढे आला नाही आणि त्याने ओळखही दाखवली नाही. उलट तो म्हणाला,"हे ब्राह्मण! तू माझा मित्र कसा असू शकतो? बालपणातील गोष्ट विसरुन जा. मैत्री ही नेहमी बरोबरीच्या लोकांमध्ये होत असते. तू तर एक दरिद्री ब्राह्मण आहेस, तुला काय पाहिजे ते माग. मी तुला दान देण्यासाठी तयार आहे."

गुरु द्रोणाचार्यांना हा अपमान सहन झाला नाही. त्यांनी प्रतिज्ञा केली,"हे अभिमानी द्रुपद! तू माझी मैत्री नाकारलीस, शिवाय मला अपमानितही केलेस. या अपमानाचा बदला मी घेईनच; परंतु तुझ्या राज्यात जेवढ्या गाई आहेत तेवढ्या सगळ्या मी घेऊन जाईन आणि तुलाही बंदी बनवून नेईन."

द्रुपदचा प्रतिशोध घेण्याची प्रतिज्ञा करत गुरु द्रोणाचार्य आश्रमात परतले. जेव्हा कौरव–पांडवांचे अध्ययन पूर्ण झाले. तेव्हा त्यांनी गुरुदक्षिणा काय देऊ? असे विचारताच द्रोणाचार्य म्हणाले,"तुम्ही अभिमानी द्रुपद राजाला बंदी बनवून माझ्या समोर आणा आणि त्याच्या राज्यातील सर्व गाई या आश्रमात आणून बांधा."

पुढे अर्जुनाने द्रुपदवर हल्ला करुन त्याला बंदी बनवले आणि गुरु द्रोणाचार्यांच्यासमोर उभे केले व त्याच्या राज्यातील सर्व गाई आश्रमात आणल्या.

अशाप्रकारे आपल्या अपमानाचा बदला द्रोणाचार्यांनी घेतला खरा; पण बालपणातील मैत्रीत मात्र हाडवैर निर्माण झाले.

मित्रांनो, मैत्रीच्या अनेक कथा आहेत. कर्ण आणि दुर्योधन यांचीदेखील मैत्री होती; परंतु ती मैत्री गरजेपोटी केलेली मैत्री होती. कृष्ण सुदामा यांची देखील मैत्री होती; त्यांची मैत्री ही निस्वार्थ भावनेने व निखळ प्रेमाने केलेली मैत्री होती आणि हीच खरी मैत्री आहे.

❖❖❖

# बालकवी

श्रावणमासी हर्ष मानसी,
हिरवळ दाटे चोहीकडे

ही कविता तुम्ही ऐकली किंवा वाचली असेल. निसर्गाचं सुंदर वर्णन करणारे हे कवी म्हणजेच आपले 'बालकवी' त्र्यंबक बापूजी ठोंबरे. श्रावणातील निसर्गाचं वर्णन करणाऱ्या या कवीचा जन्म देखील श्रावण महिन्यातच म्हणजे १३ ऑगस्ट १८९० रोजी खानदेशातील जळगाव जिल्ह्यातील धरणगाव या गावी झाला. बालकवींना चार भावंडे होती. त्यात त्यांचा तिसरा क्रमांक. त्यांचे वडील बापूराव पोलीस खात्यात फौजदार होते. त्यांच्या आईचे नाव गोदूबाई होते. त्या आध्यात्मिक प्रवृत्तीच्या असून उत्तम गृहिणी होत्या. बालपणापासून बालकवींना निसर्गाची प्रचंड ओढ. नदीकिनारी जाऊन शांतपणे निसर्गाची रुपे न्याहाळणे हा त्यांचा छंद. १९०३ साली बालकवी यांचे मराठी शिक्षण संपले. इंग्रजी शिक्षणासाठी ते धुळ्याला गेले. पुढे ते राष्ट्रीय शाळेत शिक्षण घेऊ लागले. कारण तो काळ देशभक्तीने भारलेला होता. वयाच्या १३ व्या वर्षीच यांनी पहिली कविता लिहिली. पुढे सतराव्या वर्षी त्यांच्या जीवनात एक अतिशय महत्त्वाची घटना घडली. जळगाव येथे १९०७ साली कवीसंमेलन झाले. या संमेलनात बालकवी यांनी आपली कविता सादर केली.

"अल्पमती मी बालक नेणे
काव्यशास्त्रव्युत्पत्ती"

ही कवितेची पहिली ओळ ऐकताच जमलेल्या मोठ्या कवींनी त्यांचे टाळ्या वाजवून खूप कौतुक केले. संमेलनाचे अध्यक्ष कर्नल कीर्तीकर आणि रेव्हरंड टिळक यांनी त्यांना बालकवी हा किताब दिला व काव्य लेखनासाठी प्रोत्साहन दिले. रेव्ह. टिळकांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांनी त्यांच्यावर पुत्रवत प्रेम केले. वयाच्या अठराव्या वर्षी बालकवींचा

कथा

# अटळ सत्य

लुंबिनी नगरातील ही एक घटना आहे. एक गरीब विधवा स्त्री होती. ती आपल्या लहानग्या मुलासह एका झोपडीत राहत होती. दिवसभर काबाडकष्ट करून ती आपला उदरनिर्वाह चालवत होती. तिला आपलं म्हणायला असं कोणी नातेवाईक नव्हतं. तिचं मूल हेच तिच्यासाठी सर्वस्व होतं.

एके दिवशी ती दोघं जंगलात लाकडं तोडायला गेली असताना एक विषारी साप तिच्या मुलाला चावला. विषाच्या भयंकर प्रभावामुळे मुलगा ताबडतोब गतप्राण झाला. ती स्त्री धाय मोकलून रडू लागली. आपल्या मुलाचा मृतदेह घेऊन ती झोपडीत आली. तिचे आक्रंदन पाहून प्रत्येकाला तिची दया येई; परंतु मृत्यूपुढे कोण काय करणार?

भगवान गौतम बुद्ध आपल्या नगरीमध्ये आलेले आहेत हे तिला जेव्हा कळले तेव्हा ती ताबडतोब मुलाला घेऊन त्यांच्याकडे गेली आणि त्यांचे पाय धरुन विनवणी करत म्हणाली,"भगवन! आपणच माझ्या मुलाला जीवंत करु शकता, आपण काहीही करा; परंतु मला माझा मुलगा

जीवंत हवा."

गौतम बुद्धांनी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; परंतु ती काही ऐकायला तयार नाही. तेव्हा ते म्हणाले," मी तुझ्या मुलाला जीवंत करुन देईन; परंतु एका अटीवर...." ती पटकन म्हणाली,"महात्मन! मी तुमची कोणतीही अट पूर्ण करायला तयार आहे, सांगा काय करू मी?" बुद्ध म्हणाले,"माझ्यासाठी भिक्षा घेऊन ये; परंतु ती भिक्षा अशा घरामधून आण, की ज्या घरामध्ये आजपर्यंत कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झालेला नसेल."

त्यांच्या या बोलण्याने तिला दिलासा मिळाला आणि ताबडतोब ती भिक्षापात्र घेऊन प्रत्येक घरी फिरू लागली. तिला जेव्हा कळले, की प्रत्येक घरात कोणाचा न कोणाचा मृत्यू झालेला आहे, ज्या घरात मृत्यू झालेला नाही असे एकही घर तिला मिळाले नाही. शेवटी निराश होऊन ती गौतम बुद्धांकडे आली.

बुद्ध म्हणाले,"हे भगिनी! मृत्यू हे या जीवनाचं अटळ सत्य आहे. मोठमोठे महारथी, दैवी पुरुष यांना देखील मृत्यू टाळता आला नाही. जन्म–मृत्यू हे निसर्गाचं एक चक्र आहे. जो जीव जन्माला येतो त्याला कधी ना कधी हा नश्वर देह सोडून जावेच लागते. आता तुझ्यापुढे एकच मार्ग आहे, तो म्हणजे तू या दुःखाचा धैर्याने सामना करावा. जे अटळ सत्य आहे त्याचा स्वीकार करावा."

❖❖❖

विवाह झाला. त्यावेळी त्यांच्या पत्नीचे वय होते सात वर्षे. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. १९११ च्या अखेरीस ते पुण्याला गेले. केसरी वृत्तपत्रात काही काळ नोकरी केली; पण त्यांची भ्रमंती थांबत नव्हती. ५ मे १९१८ हा त्यांच्या जीवनातील काळा दिवस. आपल्याच तंद्रीत रेल्वेरुळ ओलांडत असताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला. जळगावला त्यांच्या मित्राकडे त्यांना जायचे होते; पण मृत्यूने त्यांना ओढून नेले. त्यावेळी त्यांचे वय अवघे २८ वर्षांचे होते.

एवढ्याशा अल्प जीवनात एक श्रेष्ठ कवी म्हणून त्यांनी अवघ्या महाराष्ट्राचे मन जिंकले. निसर्ग हा त्यांच्या कवितेचा मध्यवर्ती बिंदू. निसर्गाचे विभ्रम आपल्या काव्यातून बालकवी यांनी टिपले होते. बालकवी यांच्या सर्व कविता अजरामर आहेत. तारकांचे गाणे, संध्या रजनी, अरुण, फुलराणी, आनंदी आनंद गडे, निर्झरास, पारवा, निराशा, खेड्यातील रात्र अशा असंख्य कविता आजही अनेकांच्या मुखी आहेत. बालकवी यांनी काही बालकथाही लिहिलेल्या आहेत. प्राणी वनस्पती यांच्यावर या बालकथा आधारित आहेत. अशा या निसर्गकवीला कोटी कोटी प्रणाम!!

❖❖❖



# विचारपुष्प

## सहनशीलता आणि विशालता

ब्रह्मज्ञानाने जेव्हा आपले या विशाल निरंकार प्रभू परमात्म्याशी नातं जुळेल तेव्हाच आपलं मन दृढ आणि विशाल होईल.

जसजसं या विशाल प्रभूला हृदयात स्थान देऊ तसतसं आपलं मनही विशाल आणि सहनशील होत जाईल. सहनशीलतेबद्दल हरदेववाणीमध्ये म्हटले आहे–

क्षमाशीलता जिसके अंदर
वो सुंदर इंसान बना
जिसने जितना सहन किया है,
उतना ही महान बना

सहन करणारा महान ठरतो, असं म्हटलेलं आहे; परंतु याचा अर्थ असा नाही की सहनशीलता केवळ जगाला दाखवण्यासाठी धारण करायची आहे. समजा, एखाद्याच्या पायात काचेचा तुकडा घुसला असेल तर त्याने लगेच तो तुकडा काढून टाकायला हवा आणि जखमेवर औषध लावून पट्टी बांधावी किंवा डॉक्टरांची मदत घ्यावी. यातच खरं शहाणपण आहे; परंतु त्या व्यक्तीने जर पायात रुतलेला काचेचा तुकडा तसाच ठेवला आणि वेदना सहन करत तो जगाला दाखवत असेल, की बघा मी किती सहन करतो. तर याला सहनशीलता म्हणता येणार नाही.

काही वेळा तर असंही ऐकायला आणि बघायला मिळतं, की आपल्याला कोणी काही बोलत असेल आणि जर आपण त्याला प्रत्युत्तर दिलं नाही तर लोक म्हणतात, की तुम्ही गप्प का बसलात? त्याला सडेतोड उत्तर द्यायला हवं होतं. पण संतांना हे ठाऊक आहे, की हा भ्याडपणा नसून ही सहनशीलता आहे. सहनशीलता हे वीरतेचं प्रतीक आहे. कारण समोरची व्यक्ती जे बोलते ते ऐकून आपल्या मनाला जर वेदना होत असतील आणि आपणही तसेच बोललो तर त्याच्याही मनाला तेवढ्याच वेदना होतील हे जाणून संत–सज्जन शांत असतात. नम्रता धारण

(पान १२ वर)

# तोडणं सोपं,पण जोडणं कठीण

मधु नावाचा एक छोटा मुलगा होता. आई बाबांचा अतिशय लाडका; परंतु तेवढाच हट्टी आणि रागीटही होता. त्याच्या मनाविरुद्ध काही झाले, की तो खूप रागवायचा. रागाच्या भरात कोणाला काहीही बोलायचा. अनेकांची मनं दुखवायचा. एकेदिवशी त्याच्या बाबांनी त्याच्या हाती एक पिशवी दिली आणि म्हणाले,"बाळ मधू, या पिशवीत एक हातोडी आहे आणि काही खिळे आहेत. ज्यावेळी तुला राग येईल, तेव्हा तू यातील एक खिळा घेऊन भिंतीवर ठोक."

पहिल्या दिवशी त्याने पस्तीस खेळ ठोकले. मात्र पुढच्या काही दिवसात खिळ्यांची संख्या कमी व्हायला लागली. हळूहळू तो रागावर नियंत्रण ठेवायला शिकला. त्याला

जाणीव झाली, की रोज रोज खिळे ठोकण्यापेक्षा रागावर नियंत्रण ठेवणे सोपे आहे. एक दिवस असा उजाडला, की त्याला एकही खेळा ठोकण्याची वेळ आली नाही. ही गोष्ट पाहून वडिलांनी त्याचं खूप कौतुक केले आणि सांगितले, की आता तू रागावलास की प्रत्येक वेळी तिथला एक खिळा काढायचा. मुलगा त्याप्रमाणे करु लागला. एके दिवशी तिथे एकही खिळा उरला नाही. वडिलांनी याही गोष्टीचे कौतुक केले. मुलगा आनंदी झाला. वडील त्याला घेऊन त्या भिंतीपाशी गेले व म्हणाले,"बाळ, रागावर नियंत्रण मिळवलंस ही चांगली गोष्ट आहेच; पण आता भिंतीवरील छिद्रं मात्र तशीच राहणार आहेत. याचा अर्थ आपण रागाने काहीतरी बोलून जातो आणि दुसऱ्याच्या मनावर असेच ओरखडे उठवतो. नंतर राग शांत झाल्यावर आपल्याला चूक कळते; पण दुसऱ्याच्या मनावरील ओरखडे मात्र तसेच राहतात. ते कधीच घालवता येत नाहीत. म्हणून कधीही कोणाला बोलताना विचार करुनच बोलावे. आयुष्यात चांगली माणसं मिळवणं फार कठीण असतं. त्यांना तोडणं हा एका क्षणाचा खेळ आहे; परंतु जोडणं हा संपूर्ण आयुष्याचा मेळ असतो. आता हेच पहा ना, आपण फोटो काढताना एक सेकंद स्माईल करतो तेव्हा आपला फोटो किती छान येतो. तसं, आपण जर आयुष्यभर असंच सुंदर स्माईल केलं तर आपलं आयुष्य किती सुंदर होईल, नाही का?

—रंजना भांगरे, मुलुंड

## सहनशीलता आणि विशालता

(पान १० वरुन)

करतात.

कित्येकदा ट्रॅफिकमध्ये एखाद्या गाडीचा धक्का दुसऱ्या गाडीला लागला तर दोन्ही ड्रायव्हर खाली उतरुन एकमेकांना दोष देऊ लागतात. त्यांच्यामध्ये तू तू मी मी सुरु होते. छोट्याशा घटनेने वातावरण अशांत होते. अशावेळी जे संत प्रवृत्तीचे असतात ते माफीच मागतात. समोरच्याची चूक आहे हे माहीत असूनही हसत मुखाने म्हणतात, की काही हरकत नाही चूक आमच्याकडूनही होऊ शकते. आज तुमच्याकडून झाली. असाच क्षमा आणि सहनशीलतेचा भाव असेल तर विनाकारण समस्या न वाढता तिथेच संपून जाते.

प्रत्येक जण वेगवेगळ्या ठिकाणी श्रद्धा, आस्था आणि विश्वास बाळगत असतो त्यामुळे विविधता दिसत असूनही जे धार्मिक सहिष्णुता असणारे सज्जन असतात त्यांना ती विचित्र वाटत नाही. कारण ते सर्वांना सामावून घेतात. परंतु मन जर संकुचित केले तर केवळ द्वेषभावनाच मनात जन्म घेते. त्यामुळे इतरांचंही नुकसान होतं आणि स्वतःलाही त्रास होत राहतो.

सहनशीलता आणि विशालता हे सद्‌गुण आहेत तो कमकुवतपणा नसून ती आपली ताकद आहे. जेव्हा आपल्या जीवनात आपल्या आचार विचारांमध्ये सहनशीलता आणि विशालता येते तेव्हाच आपलं जीवन खरोखरच सुंदर बनतं . विशाल हृदयच या विशाल ईश्वराशी जोडलं जातं.

❖❖❖

# दादाला विचारु या..!

## प्रश्न आपल्या मनातले, उत्तर सद्‌गुरु बाबाजींचे

प्रश्न : सद्‌गुरु बाबा गुरबचनसिंहजींच्या मते खरा निरंकारी कोणाला म्हणावे?
उत्तर : जो आपला परका असा भेदभाव करत नाही किंवा ज्ञानवान अथवा ज्ञान न घेतलेला यांच्यामध्ये भेद करत नाही, तसेच जातपात, धर्म, प्रांत, भाषा या वरुन कोणाचा द्वेष करत नाही. सर्वांच्या सुख–दुःखात सहभागी होतो. प्रत्येकाला मानवतेच्या भावनेने जवळ घेतो व प्रत्येकाच्या हृदयात स्थान मिळवतो, तोच खऱ्या अर्थाने निरंकारी होय.

प्रश्न : गुरु कोणाला म्हटले आहे?
उत्तर : गुरु हे देहाचं नाव नसून ज्ञानाचं नाव आहे. कोणताही देह हा गुरु नसून ज्ञान हाच खरा गुरु आहे. त्यामुळे देहाचा जरी नाश झाला तरी गुरुचा नाश होत नाही. गुरु हा दुसऱ्या देहात प्रकट होत असतो. म्हणून गुरु अविनाशी आहे. गुरु बनवला जात नाही तर गुरु असतोच. कधी, कोणत्या रूपात प्रगट व्हायचं हे गुरुच जाणे . त्या देहात प्रकट होऊन गुरु आपलं दैवी कार्य करु लागतो.

प्रश्न : आपल्या विरोधकांशी आपण कसे वागले पाहिजे?
उत्तर : आपला अपमान करणारे, आपला खोटा प्रचार करणारे यांच्याबद्दल आपल्या मनात रोष येऊ देऊ नये किंवा सूड घेण्याची भावना निर्माण होऊ नये. कारण सूड त्याचाच घेतला जातो, जो परका असतो. आपल्या सर्वांचा पिता परमपिता परमात्मा आहे म्हणून आपण सारी सख्खी भावंडं आहोत. जसं,आपलं एखादं भावंडं जर चुकीच्या मार्गाने गेलं किंवा त्याने खोडसाळपणा केला असेल तर आपण त्याच्यावर सूड उगवत नाही किंवा त्याला मारहाण करत नाही, तर त्याला प्रेमाने समजावत असतो. तसं विरोधक देखील आपलीच भावंडं असल्याने त्यांच्याविषयी द्वेषभावना न बाळगता त्यांना प्रेमानेच सुधारण्याची गरज आहे.

प्रश्न : निरंकार प्रभूची कृपा कशाला म्हटले आहे?
उत्तर : भौतिक जगातील सुखसुविधा प्राप्त करणे, घरदार, बंगला– गाडी, धन–दौलत प्राप्त होणे ही प्रभूची कृपा नाही; तर प्रभू परमात्म्याचे ज्ञान प्राप्त होणे, आपल्या मूळ स्वरुपाची ओळख होणे हीच निरंकार प्रभूची कृपा होय. कारण या भौतिक पदार्थांचं स्थिर अस्तित्व नाही. हे पदार्थ कायम आपल्याला साथ देणारे नाहीत. म्हणून निरंकार प्रभूला सोडून केवळ दुनियावी पदार्थांच्या मागे धावणे, त्यांच्या प्राप्तीची लालसा बाळगणे म्हणजे मूळ उद्देशापासून भरकटणे आहे. भौतिक वस्तूंच्या प्राप्ती बरोबरच निरंकार प्रभूचं ज्ञान प्राप्त करणे हाच तर मनुष्यजन्माचा खरा उद्देश आहे.

प्रश्न : दाताची तपासणी करण्यासाठी दंतवैद्य अंतर्वक्र आरसा बसविलेला चमचा का वापरतात ?

उत्तर : अंतर्वक्र आरशाच्या नाभीय अंतराच्या आत ठेवलेल्या वस्तूची मोठी व सरळ प्रतिमा मिळते. दाताची तपासणी करण्याकरिता अंतर्वक्र आरसा बसविलेला चमचा वापरल्याने दातांची व दाढांची विशाल प्रतिमा दिसू शकते व त्यामुळे दातातील खड्डे व इतर दोष स्पष्टपणे पाहता येतात.

प्रश्न : दिव्याच्या ज्योतीचे टोक नेहमी वरच का असते ?

उत्तर : पेटलेल्या दिव्याचीच नाही तर मेणबत्तीची, आगकाडीची व पेटल्या लाकडाची ज्योत नेहमी वर असते; कारण ह्या इंधनात कार्बन व हायड्रोजन असतात. जेव्हा हे पदार्थ जळतात तेव्हा कार्बनचा हवेतील ऑक्सिजनशी संयोग होऊन कार्बन–डाय–ऑक्साईड तयार होतो. हायड्रोजनचा ऑक्सिजनशी संयोग होऊन पाण्याचं वाफ तयार होते. इतरही काही वायू तयार होतात. या ज्वलन प्रक्रियेमुळे उष्णता व प्रकाश तयार होतात. अशा जळणाऱ्या वायूमुळेच ज्योत तयार होते. ज्वलन क्रियेतील हवेपेक्षा हलके असल्याने ते वर जातात त्यामुळे ज्योत वरच्या बाजूला जाते.

प्रश्न : दव व धुके कसे तयार होते ?

उत्तर : ठराविक तापमानास हवेच्या ठराविक आकारमानात काही विशिष्ट मर्यादेपर्यंतच पाण्याची वाफ सामावली जाऊ शकते. सामान्यतः दिवसा हवेचे तापमान अधिक असल्याने समाविष्ट पाण्याच्या वाफेने हवा संपृक्त होऊ शकत नाही.

तापमान कमी झाल्यावर हवेची पाण्याची वाफ सामावून घेण्याची क्षमता कमी होते. हिवाळ्यात रात्रीच्या वेळी हवेचे तापमान दवबिंदूइतके कमी होऊ शकते. तापमान दवबिंदूपेक्षा खाली गेल्यास हवेतील पाण्याच्या वाफेचे संघनन होते व ती थंड पृष्ठभागावर जमा होते. थंड पृष्ठभागावर जमा झालेल्या या पाण्याला दव म्हणतात. जेव्हा हवेतील पाण्याच्या वाफेचे संघनन वातावरणातील सूक्ष्म धुलीकणांवर होते तेव्हा धुके तयार होते.

# शब्दकोडे

## १९८

❍ पूजा अरोडा (रेवाडी-हरियाणा)



## आडवे शब्द

2. गुजरातमधील एक शहर (अजमेर/वडोदरा)
4. 'पन्हाळगड' हा किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे ?
5. या वाक्यात लपलेल्या एक देशाचे नाव शोधा 'नालंदा बिहारमधील प्राचीन बौद्ध विद्यापीठ आहे.'
7. लीप वर्षाच्या एकूण दिवसांपैकी 57 दिवस कमी
10. पंडित रविशंकर हे संगीत क्षेत्रातील सुप्रसिद्ध ..... वादक होते
12. वरण, भाजीमध्ये वापरण्यात येणारा पिवळा पदार्थ
14. फुलातील मध गोळा करणारा कीटक
15. क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मस्थान रायगड जिल्ह्यात कोठे आहे ?

## उभे शब्द

1. 'राष्ट्रीय क्रीडा दिन' ..... ऑगस्टला साजरा करतात
2. हनुमंताला अमरत्वाचे ..... होते
3. देहदानाचा आदर्श म्हणून पुराणातील कोणत्या ऋषीचा उल्लेख केला जातो?
6. संत निरंकारी मिशनचे पाक्षिक वृत्तपत्र 'एक .....'
8. तलाव किंवा साठलेल्या पाण्यावरती हिरव्या रंगाचे साठलेले असते
9. साखर कशा पासून बनते ?
11. तापमान मोजण्याचे साधन
12. गैरहजरच्या विरुद्ध
13. खालीलपैकी कोणते क्षेत्र केंद्रशासित प्रदेशात मोडते ? बिहार, दमण, पंजाब, आसाम

उत्तरे इतरत्र

# आजोबा

चित्रांकन
लेखन, रंग
अजय कालडा

आटपाट नगर होतं. त्या नगराबाहेर एक सुंदरशी बाग होती. तिला राक्षसबाग म्हटले जाई. नगरीतील मुलं अधूनमधून तिथं खेळायला जात.

बागेचं नाव जरी राक्षसबाग असलं तरी तिथं राक्षसाला कुणी पाहिलं नव्हतं.

हिवाळ्यात त्या बागेतील तलाव गोठून जात. टेकड्यांवर बर्फ जमा होई. त्यावेळी राक्षस आपल्या गुहेत बसून वसंत ऋतू येण्याची वाट पाही.

एके दिवशी राक्षसाने काही मुलांना बागेत खेळताना पाहिले. त्याला खूप राग आला. या बागेत पुन्हा यायचे नाही असे सांगत त्याने मुलांना धमकावले.

आपल्या पश्चात मुलांनी बागेत येऊ नये म्हणून त्याने बागेच्या भोवती उंचच उंच भिंत बांधली.

बागेमध्ये त्याने एक सूचनाफलकही लावला - या बागेत येणाऱ्याला मृत्यूदंड दिला जाईल.

या बागेत येणाऱ्याला मृत्यूदंड दिला जाईल.

हिवाळा संपून उन्हाळा सुरु झाला. वसंत ऋतूत सगळीकडे हिरवळ पसरली. पक्षी आनंदाने बागडू लागले. पण राक्षसबाग मात्र थंडीने गारठलेली होती.

राक्षस आपल्या गुहेतून रोज बाहेर येऊन वसंत ऋतुची वाट पाहत असे. पण बागेत सगळीकडे शुकशुकाट दिसे. तलाव गोठलेलच असत.

एके दिवशी राक्षसाला कोकिळेचे गोड गाणे ऐकू आले. बाहेर बर्फ वितळलेले दिसले. झाडे आनंदाने डोलत होती.

पक्षी किलबिलाट करत होते, त्याला खूप आनंद झाला. राक्षस त्या बागेत आनंदाने नाचू लागला. तेवढ्यात –

राक्षसाला मुलांच्या खेळण्याचा आवाज ऐकू आला. तो मुलांना मारायला धावला. मुले घाबरुन भिंतीच्या फटीतून बाहेर पळाली.

मुलं निघून गेल्यावर बागेतील आनंदाचे वातावरणही दूर झाले. तलाव गोठले. पक्षी दूर उडून गेले, झाडं गारठली.

काही दिवसांनी पुन्हा मुलांना खेळताना राक्षसाने पाहिले. पण तो त्यांना रागावला नाही. कारण त्याला कळून चुकले, की मुले खेळायला आली तरच बागेत आनंदाचे वातावरण तयार होते. झाडे डोलतात, पक्षी गातात. आता मुले तेथे रोज खेळतात. राक्षसबाग आता मुलांची बाग बनली.

# उपकाराची परतफेड

बऱ्याच वेळेला उपकाराची परतफेड अपकाराने केलेली पाहायला मिळते. त्यामुळे उपकार करतानाही योग्य त्या व्यक्तीची पारख करुनच उपकार करावेत. त्यामुळे उपकाराच्या परतफेडीची अपेक्षा नसली तरी किमान आपलं नुकसान होणार नाही याची तरी दक्षता घेता येईल.

एका घनदाट जंगलात एका गुहेमध्ये वाघ आणि वाघीण आपल्या पिलांसह रहात होते. एकदा ते दोघेही आपल्या पिलांना गुहेत सोडून शिकारीसाठी दूर जंगलात गेले. संध्याकाळ होत आली तरी ते परत आलेच नाही. इकडे पिलांना खूप भूक लागली. त्यांचे रडणे ऐकून एका बकरीला त्यांची दया आली. तिने वाघिणीच्या पिलांना आपले दूध पाजले. पिलांच्या जीवात जीव आला.

आता बकरी रोज येऊन त्यांना दूध पाजू लागली. होता होता चार दिवस निघून गेले.एक दिवस पिले पोट भरल्यानंतर मस्ती करु लागली. तेवढ्यात तिथे वाघ आणि वाघीण परतले. बकरीला

पाहून आयती शिकार मिळाल्याच्या आनंदात तिच्यावर वाघ झडप घालणार इतक्यात वाघाची पिले म्हणाली,"आई–बाबा या शेळीने आम्हाला दूध पाजून मोठे केले. ही नसती तर आम्ही मरुन गेलो असतो. हिचे आपल्यावर खूप उपकार आहेत. तुम्ही हिला मारु नका."

हे ऐकून वाघ खूश झाला आणि तिला म्हणाला,"आम्ही तुझे हे उपकार विसरणार नाहीत. आता तू स्वतंत्रपणे आनंदाने जंगलात एकटी सुद्धा वावरु शकतेस. कुणीही तुला त्रास देणार नाही. याची मी ग्वाही देतो." तेव्हापासून बकरी मोठ्या धाडसाने जंगलात निर्धास्तपणे कुठेही फिरु लागली.

एकदा बकरीला वाघाच्या पाठीवर बसून उंच झाडांची पाने खातांना एका गरुडाने पाहिले आणि कुतूहलाने त्याने बकरीला याबद्ल विचारले. बकरीने त्याला वाघाच्या पिलांना दूध पाजल्याची सर्व हकीकत सांगितली. उपकाराचे महत्व गरुडाच्या लक्षात आले. आपणही असंच महान कार्य करायचं असं गरुडाने मनातल्या मनात ठरवलं.

एकदा गरुड उडत असतांना त्याला काही उंदराची पिलं दलदलीत फसलेली दृष्टीस पडली. ती बाहेर पडायचा प्रयत्न करत असता अधिकच खोल जात होती. शेवटी गरुडाने त्यांना अलगद बाहेर काढले.

उंदराची पिलं भिजल्यामुळे थंडीने कुडकुडत होती. गरुडाने त्यांना आपल्या पंखात बराच वेळ ऊब दिली. थोड्या वेळाने गरुड आपल्या घरट्याकडे जाण्यासाठी निघाला. त्याने उंदराच्या पिलांचा निरोप घेतला आणि भरारी घेण्याचा प्रयत्न केला, पण काही केल्या त्याला उडता येईना. तो अस्वस्थ झाला. त्याने पुन्हा एकदा पंखांचा फडफडाट करुन पाहिला. तेव्हा त्याच्या लक्षात आलं, की उंदराच्या पिल्लांनी ऊब घेता घेता आपले संपूर्ण पंख कुरतडले होते. कसाबसा गरुड तेथून बकरीपर्यंत पोहचला आणि त्याने बकरीला उंदराच्या पिल्लांना मदत केल्याची घटना सांगत विचारले. "तू पण उपकार केलेस आणि मी पण उपकारच केले. पण दोघांना वेगवेगळे फळ कसे मिळाले?"

त्यावर बकरी हसली आणि म्हणाली,"जे वाघासारखे दिलदार मनाचे असतात त्यांच्यावर उपकार करावेत, उंदरासारख्या क्षूद्र आणि स्वार्थी असणाऱ्यांवर नाहीत. कारण, स्वार्थी लोक नेहमी आपल्या स्वार्थाकरता दुसऱ्याचा बळी देतात . स्वतःचा स्वार्थ साधला, की ते उपकार करणाऱ्याला विसरतात एवढंच काय पण त्याच्या चांगल्या स्वभावाचा फायदा घेऊन त्यालाही धोका देतात.. मात्र दिलदार स्वभावाचे लोक निस्वार्थी आणि कृतज्ञ असतात.ते उपकार करण्याऱ्याला आयुष्यभर लक्षात ठेवतात."

❖❖❖

# श्रावण महिन्यातील आहार

या काळामध्ये हवेत आर्द्रता(दमटपणा) असते.

'क्षणात येते सरसर शिरवे,
क्षणात फिरुनी ऊन पडे'

या कवितेच्या ओळीप्रमाणे वातावरणात ऊन–पावसाचा खेळ चालू असतो. पाऊस पडल्यावर गारवा निर्माण होतो आणि लगेच ऊन पडल्यावर उष्णता जाणवू लागते. या दुहेरी तापमानात शरीराचे संतुलन ठेवणे अवघड जाते. आपली पचनशक्ती देखील मंदावलेली असते. त्यामुळे या काळात पचनशक्तीवर फार ताण पडणार नाही असा हलका–फुलका आहार असावा. कदाचित यामुळेच श्रावण महिन्यामध्ये उपवास केले जातात.

या काळात निसर्गामध्ये अनेक पालेभाज्या, फळे उपलब्ध होतात. ती सर्व शरीराला हितकारक असतात. म्हणून आपले आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी या दिवसात उपलब्ध असलेल्या सर्व पालेभाज्या व फळे खावीत. पचनशक्ती कमकुवत असल्याने श्रावणात मांसाहार पूर्णपणे वर्जित केला जातो .शिवाय समुद्रामध्ये माशांचा प्रजनन काळही याच कालावधीत सुरु झालेला असतो.

श्रावण महिन्यात शक्यतो कडधान्य रोज खाणे टाळावे. आठवड्यातून एक दोन वेळा; परंतु मोड आलेल्या कडधान्यांचा सामावेश जरुर करावा. जेवणातील पदार्थ पचण्यास हलका व्हावा यासाठी त्यात लसूण, आले, हिंग, जिरे, कोथिंबीर ,पुदिना, सैंधव मीठ यांचा वापर जरुर करावा.

पालेभाज्यांमध्ये चाकवत, अळू, तांदुळजा, अंबाडी, शेवग्याचा पाला, कंटोली, शिवर, बांबूचे अग्र, टाकळा अशा भाज्यांचा समावेश करावा. या भाज्यांचे वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मही आहेत.

## अळू

याची पानं व देठ बारीक चिरुन भाजी करतात. ही भाजी भूक वाढवणारी व मलदोष दूर करणारी आहे. पित्तशामक व कृमी कमी करणारी आहे.

## तांदूळजा

चवीला गोड असणारी ही भाजी रुचकर असून भूक वाढवणारी असल्याने सर्वांसाठी उपयुक्त असते.

## अंबाडी

ही भाजी चवीला आंबट असते. अजीर्ण झाल्यास ही भाजी जरुर खावी. फक्त श्रावणातच ती उपलब्ध असते. आंबट चवीच्या पदार्थामुळे वातदोषावर नियंत्रण ठेवता येते. या भाजीने तोंडाला चवही येते आणि भूकही वाढते.

### शेवगा पाला

शेवग्याच्या झाडाच्या कोवळ्या पाल्याची भाजी श्रावणात जरुर खावी. त्यामुळे पावसाळ्यात होणारा कफ कमी होतो. बिघडलेल्या पित्ताचाही त्रास कमी होतो. कोठा साफ होऊन अनावश्यक पित्त बाहेर पडते.

### कंटोली

ही चवीला कडू, तिखट, भूक वाढवणारी भाजी फळभाजी या प्रकारात येते. छोटी हिरवी काटेरी फळं असलेली ही भाजी पोटशूळ, खोकला, दमा या आजारावर उपयुक्त ठरते. ही पथ्यकर भाजी असल्याने सर्वांना उपयुक्त आहे.

### आंबट चुका

ही भाजी पचायला हलकी तसेच पोटात होणारी आग थांबवणारी व पोट साफ करणारी अशी पथ्यकर भाजी सर्वांसाठीच उपयोगी आहे.

श्रावणात उपवास करताना बहुतेक जण दूध सेवन करतात. परंतु या दिवसात दूध उकळून कोमट करुन प्यावे. त्यात हळद, केशर, वेलची, सुंठ असे पदार्थ घालून दूध उकळले तर आरोग्यदृष्ट्या ते अधिक फायदेशीर ठरते. ज्यांना दमा व वारंवार सर्दी आहे अशांनी दूध वर्ज्य" करावे.

श्रावणात मोसंबी, पेरु, डाळिंब या फळांचे सेवन करणे गरजेचे आहे. पचनेंद्रियांना विश्रांती देण्यासाठी या फळांच्या रसाचे सेवन करावे. तसेच लिंबूपाणी मोसंबीचा ज्युस सकाळी घेऊन योगा प्राणायाम करावा. तहान कमी लागत असली तरी आवश्यक तेवढे पाणी प्यावे.

❖❖❖

# नेक बनू या

चंदनाच्या शेजारी
कडूनिंब उगवला
चंदनाच्या सुगंधाने
तोही सुखावला

प्रभू रामाच्या भक्तीने
हनुमंत धन्य झाला
अर्जुनाच्या प्रेमाने
केशव सारथी बनला

नारद मुनींच्या कृपेने
वाल्या धन्य झाला
वाल्मिकी ऋषी म्हणोनि
तिन्ही लोकी वंद्य झाला



सज्जनांच्या संगतीने
घडेल मानवी जीवन
मन वचन कर्माने
होईल पवित्र पावन

बसू संतांच्या संगतीत
सद्‌गुण धारण करू या
गुरुकृपेने आपण
नेक माणूस बनू या

# प्रभुशी नातं जोडा

एकदा राजस्थानातील गंगानगर या क्षेत्रात जाण्याचा योग आला. सगळीकडे रेतीच रेती. त्या ओसाड वाळवंटातून आम्ही चालत होतो. रेती उडून डोळ्यातही जात होती. चालता चालता पुढे मात्र वेगळंच दृश्य दिसलं. हिरवीगार झाडं दिसू लागली. शेती दिसू लागली. सगळीकडे हिरवळ पाहून चौकशी केली, तेव्हा कळलं की त्या भागात एक पाण्याचा कालवा वाहत आहे. त्यामुळे हा भाग हिरवागार आहे. अशाच प्रकारे ज्याच्या मनामध्ये हे नामरुपी अमृत येतं त्याच्या जीवनातील ओसाडपणा निघून जातो. वैर, इर्षा ,द्वेष यासारख्या जीवनाला ओसाड करणाऱ्या भावना तिथं कधीही दिसून येत नाहीत. तिथं प्रेम, नम्रता, दया अशा हिरवळी सारख्या सुखद भावना मनाला शांती समाधान देतात; म्हणून ज्यांच्या हृदयात अशा भावना आहेत, अशाच संत महापुरुषांच्या सान्निध्यात राहायला कोणालाही आवडेल. ज्यांच्या मनात प्रभू परमात्म्याचा निवास आहे त्यांच्या जवळच खऱ्या आनंदाची प्राप्ती होऊ शकते. ज्यांच्याकडे भक्तीचा सुगंध आहे, प्रेम आहे, तिथं कोणाला राहायला आवडणार नाही? कितीही महत्त्वाचं काम असलं तरी मनुष्य तिथे थोडा वेळ थांबणारच. संत महापुरुषांकडे सत्कर्माचा सुगंध असतो .मधुर वाणीचा गोडवा असतो .अशा भक्तजणांकडे मनुष्याला सुख शांती लाभू शकते.

या जगामध्ये परमात्म्याच्या ज्ञानाशिवाय सारं काही दुःखमय आहे ,बंधनात टाकणार आहे, संत महापुरुष परोपकारी असतात .ते योग्य मार्ग दाखवतात. सर्वसामान्य मनुष्य जगातील सर्व वस्तू प्राप्त करण्याची इच्छा करतो .शरीर निरोगी राहावं म्हणूनही धडपडतोय परंतु तीस चाळीस किंवा पन्नास साठ वर्षाचं आयुष्य उपभोगून तो हा देह सोडून जातो. पण जीवाचा प्रवास मात्र जन्मोजन्मी अखंड सुरुच असतो .लक्ष चौऱ्यांशीच्या बंधनात अडकतो. त्याचा प्रवास कधीच थांबत नाही. म्हणून संत महात्मा म्हणतात भौतिक वस्तूंचा संग्रह करण्याआधी आत्म्याच्या कायमस्वरुपी निवासाची व्यवस्था केली पाहिजे. म्हणजे देहत्यागल्यानंतर जीव हा चौऱ्यांशीच्या बंधनात अडकणार नाही .तो आपल्या मूळ स्वरुपाला प्राप्त होईल. संत महापुरुष म्हणतात,"हे मनुष्या तू जर या निराकार प्रभु–परमात्म्याला विसरुन केवळ भौतिक वस्तूंनाच महत्त्व देत राहिलास तर खरं सुख तुझ्या वाट्याला येणार नाही. जसं, घर हे माणसांसाठी असतं, माणसं घरासाठी नसतात, वहाण ही पायांसाठी बनवलेली असते,पाय वहाणांसाठी नसतात. म्हणून प्राथमिकता आपण कोणाला दिली पाहिजे हे लक्षात घेतल्याशिवाय योग्य दिशा प्राप्त होत नाही .त्यासाठी ह्या नाम धनाची प्राप्ती करुन प्रभू परमात्म्याशी मनाचं नातं जोडलं तरच पूर्णत्व प्राप्त होतं. खऱ्या अर्थाने जन्म सार्थक होतो."

❖❖❖

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

ज्ञानेश्वरी बोडके

क्रिशांक घाडिगावकर

प्रितीका शेडगे

रितिका शेडगे

संकल्प धुमाळ

ओवी धनावडे

श्लोक धनावडे

शौर्य गायकवाड

स्वस्तिक सुतार

स्वयंम जाधव

कोमल पवार

दिव्यांश पाटील

एरुता राऊत

श्रेया पाटील

आयुष कुलकर्णी

प्रतिक यादव

# हार्दिक अभिनंदन 'सूर नवा ध्यास नवा' उपविजेती राधा खुडे

पुणे जिल्ह्यातील बारामती जवळील वालचंदनगर येथे राहणारी राधा खुडे ही बालसंगतची बालिका कलर्स मराठी वाहिनीवरील सूर नवा ध्यास नवा या संगीत कार्यक्रमाच्या महाअंतिम सोहळ्याची उपविजेती ठरली आहे. त्यानिमित्ताने समस्त बालसंगत व हसती दुनिया परिवाराकडून तिचे खूप खूप अभिनंदन!

राधाचा आवाज सुरेख असल्यामुळे तिची टीव्हीच्या कलर्स मराठी वाहिनीवरील 'सूर नवा ध्यास नवा' या कार्यक्रमांमध्ये पाच हजार स्पर्धकांमधून निवड झाली. तिने गायलेली चांदणं चांदणं झाली रात, एकविरेची पाहत होती वाट, बाजाराला विकण्या निघाली, बाई माझ्या गं दुधात नाही पाणी, मल्हारी भोळा अशी अनेक गाणी लोकप्रिय झाली असून तिच्या आवाजाने महाराष्ट्रातील प्रेक्षकांना वेड लावले. 'तुझ्या ऊसाला लागल कोल्हा' या गाण्यामुळे तिला राजगायिका होण्याचाही बहुमान मिळाला.

राधाला तिचे संगीतातील गुरु चंदन कांबळे जी यांनी गायनाचे धडे दिले. सर्वसामान्य कुटुंबात राहणाऱ्या राधाच्या आई 'शीला खुडे जी' या भाजीपाला विक्रीचा स्टॉल चालवतात तर वडील 'दत्तू खुडे जी' छोटा–मोठा व्यवसाय करुन कुटुंबाचा गाडा हाकत आहेत. राधाचं शिक्षण हे वालचंदनगर मधील वर्धमान महाविद्यालयामध्ये झाले. सुरुवातीपासूनच तिला कला, संगीत व गायनाची आवड असल्याने तिने भारतीय कला महाविद्यालयामध्ये कला शिक्षणाचे प्रशिक्षण घेतले आहे.

राधाच्या या यशाचं सर्वत्र कौतुक होत असून अनेक मान्यवर व संस्थांकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

१० जुलै, राधाला वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!

सद्गुरुचरणी हीच कामना आहे, की तिच्या कलागुणांचा उत्तरोत्तर विकास होत राहो आणि सेवा– सत्संगाशी नातं अखंड जोडून राहो.

– संपादक



कथा

# कर्ताभाव

एकदा काही शिष्य आपल्या गुरुंच्या आश्रमात उपासनेसाठी गेले होते. त्या शिष्यांमध्ये शामू नावाचा एक भोळाभाबडा शिष्य होता. आठ दिवस झाले तशी त्याला घरची काळजी वाटू लागली. तो गुरुदेवांना म्हणाला,"गुरुदेव, आठ दिवस झाले मी इथं आहे. माझ्या घरी माझी बायको आणि मुलं आहेत त्यांच्यासाठी मला आता घरी गेले पाहिजे." गुरुदेव म्हणाले,"काळजी करु नकोस, अजून आठ दिवस थांब. तुझी साधना पूर्ण झाली की मगच जा. प्रत्येकाची काळजी ईश्वराला असते यावर विश्वास ठेव. तुला पुढे खूप समाजसेवा करायची आहे. त्यासाठी तुला आत्मिक बळ हवे म्हणून अजून आठ दिवस साधना करणे आवश्यक आहे; परंतु शिष्य काही ऐकेना. गुरुदेवांनी त्याला खूप समजावले .गुरुदेव म्हणाले, "कर्ता–करविता प्रभू परमात्मा आहे तो

सगळ्यांची चिंता वाहतो. माणसाला वाटतं माझ्याशिवाय काहीच होऊ शकत नाही; परंतु तसं नाहीये. या जगात येणारा प्रत्येक जीव हा आपल्या प्रारब्धानुसार जीवन व्यतीत करत असतो. तेव्हा व्यर्थ चिंता सोडून साधनेत मन जोड." त्यावर तो म्हणाला,"पण गुरुदेव त्यांना खर्चायला पैसे कोण देणार?" शेवटी गुरुदेवांचा नाईलाज झाला. ते म्हणाले,"ठीक आहे तू जा; पण जाता जाता माझं हे पत्र दोन कोसावर असलेल्या आश्रमात माझ्या शिष्याकडे नेऊन दे."

शामू गुरुदेवांचा निरोप घेऊन निघाला. तो आश्रमात पोहोचला. तेथील शिष्याला त्याने ते पत्र दिले. पत्र वाचून शिष्याने शामूला आत बोलावले आणि एका बंद खोलीत नेऊन ठेवले. कारण त्या पत्रामध्ये लिहिले होते, की मी पत्र घेऊन पाठवीत असलेल्या शिष्याला सहा महिने साधना गृहामध्ये बंद करून ठेवणे. गुरुदेवांच्या आदेशाप्रमाणे शिष्याने शामूला साधनागृहात बंद करुन ठेवले.

श्यामू चुळबूळ करु लागला, गुरुदेवांनाही दोष देऊ लागला; पण त्याचा नाईलाज झाला होता. त्याला बाहेरही पडता येईना. स्वतःवर चिडत रागावत तो तसाच दिवस काढू लागला. सहा महिन्यांनी त्याची सुटका झाली. तो तडक घरी निघाला. आपल्या बायको मुलांचं काय झालं असेल या चिंतेने खूप घाबरला होता. आपल्या गावात जाताच त्याला धक्काच बसला. कारण त्याच्या घराला कुलूप होतं .त्याने शेजारी चौकशी केली तेव्हा त्याला कळलं, की आपली बायको आणि मुलं एका मोठ्या वाड्यामध्ये राहायला गेलेत. तो धावत पळत वाड्यात गेला. बायकामुलांना सुखरुप पाहताच त्याचा जीव भांड्यात पडला. त्याने आपल्या मागे काय काय घडले ही सारी हकीकत अधीरपणाने जाणून घेतली. त्यावर पत्नी म्हणाली, की आम्ही तुमची खूप वाट पाहिली; परंतु घरातलं धान्य संपलं. उपासमार होऊ लागली म्हणून मी मजुरी करण्यासाठी सावकाराच्या घरी गेली. त्याने मला बाग काम करण्यास नोकरीला ठेवले. एके दिवशी बागेत खड्डे खणत असताना मला सोन्याच्या मोहरांनी भरलेला हंडा मिळाला. तो मी शेठजींना प्रामाणिकपणे नेऊन दिला. शेटजी खूप खूश झाले. त्यांनी मला हा एक मोठा वाडा राहायला दिला. थोडीफार शेती दिली. खाण्यापिण्याची सगळी व्यवस्थाही त्यांनीच करुन दिली. आता मला कसलीच चिंता नाही.

हे ऐकून शामूला खात्री पटली गुरुदेव बरोबर म्हणतात, कर्ता करविता परमेश्वर आहे. आपण विनाकारण भार घेऊन चालत आहोत. स्वतःला कर्ता समजत आहोत.

पूर्ण गुरु शिष्याचे सारे भ्रम आणि शंका दूर करतात.श्यामूने आपल्या गुरुदेवांवर श्रद्धा विश्वास ठेवत साधना पूर्ण केली आणि तो समाजसेवा करत आनंदाने जीवन जगू लागला.

❖❖❖

# हसा मुलांनो हसा

पेशंटः डॉक्टर, तुम्ही या कागदावर लिहून दिलेल्या सर्व गोळ्या मिळाल्या; वरच्या गोळ्या काही मिळात नाहीत.
डॉक्टरः अरे त्या गोळ्या नाहीत. पेन चालतंय की नाही ते मी बघत होतो.
पेशंटः पण एक मेडिकलवाला तर म्हणाला की त्या भारी गोळ्या आहेत. शहरातून मागवून देतो म्हणून!

मधुकाकाः (पत्नीला) अगं,मी काही आता वाचू शकत नाही.
काकूः असं का बोलताय हो. अजून आपल्याला खूप फिरायचं आहे.
मधुकाकाः अगं, माझा चष्मा फुटलाय म्हणून बोललो... मी वाचू शकत नाही.

काल मित्राच्या नातेवाईकाचं लग्न होतं. सरकारी नियमाप्रमाणे लग्न दोन तासात आटोपलं.
मी विचारलं,"मेनू काय होता?"
तो म्हणाला,"मॅगी"

ग्राहकः काय हो,आंबे अस्सल रत्नागिरीचे आहेत ना?
व्यापारीः हो हो, अस्सल रत्नागिरीचे आहेत.
ग्राहकः पेटी उघडून दाखवा बरं!
वा! अस्सल रत्नागिरीचे आहेत.
व्यापारीः लांबूनच तुम्ही कसं ओळखलंत?
ग्राहकः अहो, आंब्याच्या पॅकिंगच्या वर्तमानपत्राचा कागद मी बघितला. तो रत्नागिरीचाच आहे. म्हणजे खात्रीने आंबे रत्नागिरीचेच असणार, आहे की नाही, टॅलेंट?
व्यापारीः ( मनात म्हणाला) पण तुम्हाला काय माहिती मी रत्नागिरीवरुन फक्त पेपरची रद्दी मागवतो.. आंबे तर इथलेच भरतो.

रामरावांनी आपल्या नोकराला एका शेटजींकडे पाठवले व सांगितले, की त्यांची भेट झाली की ताबडतोब मला मेसेज कर
शेटजी गाढ झोपले होते म्हणून नोकराने रामरावांना मेसेज केला–
मालक ते गाढव शांत झोपले होते, म्हणून भेट झाली नाही. वास्तविक त्याला ते गाढ व शांत झोपले होते असे टाईप करायचे होतेय पण योग्य शब्दात अंतर न ठेवल्यामुळे मोठी चूक झाली.

डॉक्टरः गंप्या, तुझं वजन खूपच वाढत चाललय. बाहेर खायचं बंद केलंस ना?
गंप्याः हो, बाहेर खाणं कंप्लीट बंद केलय. आता पार्सल घेऊन येतो आणि घरीच खातो.

शिक्षकः पावसाळ्यात पचायला हलके पदार्थ खावेत. सांग बरं, असे पदार्थ कोणते आहेत?
गणूः सर....भजी!
शिक्षकः अरे, भजी कशी काय?
गणूः कारण तेल पाण्यावर तरंगतं. म्हणजे तेल हलकं आहे आणि तेलावर भजी तरंगते म्हणजे ती तर त्याहीपेक्षा हलकी. म्हणून पावसाळ्यात भजी खावी.

गावची शाळा
गुरुजीः पोरांनो, गाईचं दूध पिल्याने बुद्धी वाढते.
बंड्याः काय पण सांगताय गुरुजी,
तसं आसतं तर मंग गाईचं वासरु खूप शिकून मोठं नसतं का झालं!

बन्याबापू पहिल्यांदाच सासरवाडीला गेले; पण लॉक डाऊनमुळे तिकडेच अडकून पडले.
सासरवाडीला सासूबाईंनी त्यांना रोज मेथीचे नवनवीन पदार्थ करुन घातले. आठवडाभर मेथी खाऊन कंटाळलेले बन्याबापू वैतागून म्हणाले,"सासुबाई, मेथीचं शेत कुठे आहे ते मला दाखवा. मी तिकडे जाऊन चरून येतो."

# त्र्यंबकेश्वर व ब्रह्मगिरी

नाशिक शहरापासून २८ कि.मी. अंतरावर असलेल्या त्र्यंबकेश्वर या तालुक्याच्या ठिकाणी ब्रह्मगिरी पर्वत आहे. हे ठिकाण गोदावरी नदीचे उगमस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.गोदावरी नदीला दक्षिण गंगा असेही म्हणतात.

ब्रह्मगिरीच्या डोंगरावर शिवजटा मंदिर आहे. जवळच गोदावरी नदीचे मंदिर आहे. मंदिराच्या बाजूला गौतम ऋषींची मूर्ती आहे . मंदिराच्या आत गेल्यावर दोन खड्डे दिसतात.याबाबत असे सांगण्यात येते, की त्या दोन्ही खड्ड्यांमध्ये भगवान शंकरांनी गुडघे टेकले व आपला जटाभार मोकळा करत त्या ठिकाणी जटा आपटल्या आणि गंगेला मुक्त केले. तेथे खडकावर वलयं पडलेली दिसतात. तिथून पुढे दुसरा भाग येतो. त्याला गंगाद्वार म्हणतात. डोंगराच्या पायथ्याला कुशावर्त कुंड आहे. या डोंगरात लुप्त झालेली गोदावरी नदी या कुशावर्त कुंडामधून प्रकट होते आणि पुढे नाशिक, पंचवटी,बीड, जालना, पैठण, नांदेड,

गडचिरोली अशी वाहत वाहत आंध्र प्रदेशातून बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. तिची लांबी १४९५ किमी.आहे.

श्रावण महिन्यात सोमवारी ब्रह्मगिरी पर्वताला प्रदक्षिणा घालण्याचा रिवाज आहे. लाखो भाविक वीस–पंचवीस मैलांचे अंतर असलेली फेरी अनवाणी पायाने पूर्ण करतात.

ब्रह्मगिरी पर्वताच्या पायथ्याशी हेमाडपंती वास्तुप्रकारातले पुरातन शिवमंदिर आहे. हे मंदिर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. या मंदिराचे बांधकाम नानासाहेब पेशवे यांनी इसवी सन १७५५-८६ च्या दरम्यान केले. जुन्या मंदिराच्या जागीच ते उभारण्यात आले आहे. मंदिराच्या चारही बाजूला दगडी कोट बांधलेला आहे. पूर्वेला मुख्य दरवाजा असून दक्षिणेला छोटा दरवाजा आहे. मंदिराचे दगडी कोरीव काम पाहण्यासारखे आहे.

त्र्यंबकेश्वर येथे दरवर्षी निवृत्तीनाथांची यात्रा देखील भरते. त्र्यंबकेश्वरजवळ एक ते दीड किमी. अंतरावर अलीकडेच अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ निसर्गरम्य परिसरात उभारण्यात आलं आहे. 21 एकर परिसरात उभारण्यात आलेल्या या भव्य गुरुपीठात अनेक विभाग आहेत. तेथून सामाजिक, धार्मिक उत्थानाची अनेक कार्य केली जातात. १९९२ ला या वास्तूचा शुभारंभ करण्यात आला होता. तेथेही असंख्य भाविक व पर्यटक आवर्जून भेट देतात.

दर बारा वर्षांनी त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा भरतो.

❖❖❖

# उषा मेहता

तो काळ स्वातंत्र्यासाठी संघर्ष करण्याचा होता. स्वातंत्र्य सेनानींना मदत करण्यासाठी गुप्त रेडिओ स्टेशन चालवणारी भारताची पहिली महिला होती उषा मेहता. त्यांना रेडिओ वुमेन म्हणून देखील संबोधले जाते.

महात्मा गांधी यांच्या अहिंसेच्या विचारांचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. अहिंसेच्या मार्गाने चालणाऱ्या स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी स्वतःला झोकून दिले. ९ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गोवालिया टँक मैदानात भारत छोडो आंदोलनाला सुरुवात झाली. महात्मा गांधींसोबत असणाऱ्या काँग्रेसच्या मोठमोठ्या नेत्यांना इंग्रजांनी तुरुंगात डांबले; परंतु उषा मेहता त्यातून निसटल्या. भारताच्या स्वातंत्र्ययुद्धात आपली काहीतरी मदत व्हावी म्हणून त्यांनी गुप्त रेडिओ सर्विसची सुरुवात केली. १४ ऑगस्ट १९४२ रोजी उषा मेहता व त्यांच्या जोडीदारांनी एका गुप्त ठिकाणी या काँग्रेस रेडिओची स्थापना केली. या ग्रुपच्या रेडिओ

सर्विसचे पहिले प्रसारण २७ ऑगस्ट १९४२ रोजी झाले. पहिल्या प्रसारणामध्ये उषा मेहता यांनी आपल्या हळू आवाजात रेडिओवर घोषणा केली,"यह काँग्रेस रेडिओ की सेवा है, जो ४२.३४ मीटर पर भारत के किसी हिस्से से प्रसारित की जा रही है"

यावेळी त्यांचे वय २२ वर्षे होते. उषा मेहता यांच्यासोबत विठ्ठल भाई झवेरी, चंद्रकांत झवेरी, बाबुभाई ठक्कर, इत्यादी स्वातंत्र्य सेनानी होते. त्यावेळी ननका मोटवाणी हे शिकागो रेडिओचे मालक होते. त्यांनी रेडिओ ट्रान्सलेशनचे कामचलाऊ उपकरण त्यांना उपलब्ध करुन दिले.

ब्रिटिशांच्या नजरेपासून बचाव करण्यासाठी हे गुप्त रेडिओ सेवेचं स्टेशन

रोज बदलण्यात येत होतं; परंतु एवढे प्रयत्न करुनही ही रेडिओ सेवा खूप जास्त काळ चालू शकली नाही. १२ नोव्हेंबर १९४२ रोजी ब्रिटिश सरकारने उषा मेहता व त्यांच्यासोबत रेडिओ स्टेशन चालवणाऱ्या सर्व सेनानींना अटक केली. इंग्रजांचा सीआयडी विभाग गेले सहा महिने हे रेडिओ स्टेशन शोधून काढण्यासाठी जंगजंग पछाडत होता. हायकोर्टामध्ये ही केस गेली. उषा मेहता यांच्यासह सर्व स्वातंत्र्यसेनानींवर खटला दाखल करण्यात आला व त्यांना चार वर्षाची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

उषा मेहता यांची ही अटक एका टेक्निशियनने केलेल्या गद्दारीमुळे झाली. त्यावेळी उषा मेहता याविषयी बोलताना म्हणतात, ते दिवस आयुष्यातील खुप सुंदर दिवस होते. फक्त एकाच गोष्टीची खंत वाटते, की एका टेक्निशियनच्या गद्दारीमुळे फक्त तीन महिन्यात काँग्रेस रेडिओ स्टेशनची सेवा समाप्त झाली.

अशा या धडाडीच्या स्वातंत्र्य सेनानी उषा मेहता यांचा जन्म 25 मार्च 1920 रोजी गुजरातमधील सुरत जवळ सारस नावाच्या एका छोट्याशा गावात झाला. उषा मेहता यांचे वडील ब्रिटिशांच्या राज्यात जज या पदावर कार्यरत होते. वडील सेवानिवृत्त झाल्यानंतर उषा मेहता संपूर्ण कुटुंबासह मुंबईला स्थायिक झाल्या आणि मुंबईत त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला. त्या काळात रेडिओ वुमन या नावाने त्या प्रसिद्ध झाल्या.

वयाच्या ऐंशीव्या वर्षी म्हणजे ११ ऑगस्ट २००० रोजी त्यांनी देह ठेवला. त्यांच्या पवित्र स्मृतीस कोटी कोटी प्रणाम.!!

❖❖❖



# वाटते मज...

वाटते मज वाऱ्याची
मंद झुळूक मी व्हावे
दवबिंदू ते पात्यावरील
हळूच अलगद टिपावे

वाटते मज स्वप्नातील
परी जादूची व्हावे
दीन दुबळ्या पीडितांचे
दुःख दैन्य मिटवावे

वाटते मज बागेतील
रंगीत फुलपाखरु व्हावे
रंग वाटेचे माझ्या सारे
प्रकाशरुपी वाटावे

वाटते मज स्पर्शाचे
परिस असे मी व्हावे
गरिबीच्या लोहाला
एकदा स्पर्श करावे

वाटते मज पावसाचा
असा थेंब मी व्हावे
रोग गंभीर अवनीवरचे
जोरात बरसूनी मिटवावे

—सौ शुभांगी माळी नाशिक

समर्थ दर्शन : भाग - ७६

# म्हातारीची म्हैस

एके दिवशी समर्थ शिराळ्याहून निघून ब्रह्म–क्षेत्री आनंदमूर्तीच्या दर्शनासाठी गेले. आनंदमूर्ती हे रघुनाथ स्वामींचे शिष्य. समर्थ आलेले आहेत असे समजतात स्नानसंध्या करत असलेले आनंद मूर्ती तसेच उठून बाहेर आले. समर्थांना त्यांनी साष्टांग नमस्कार घातला.

समर्थांचे आदरातिथ्य झाल्यानंतर समर्थ रघुनाथ स्वामींच्या वृंदावनात गेले. तेथे त्यांनी प्रदक्षिणा घालून नमस्कार केला. तेव्हा सगळे वृंदावन आपोआप डोलू लागले. हे पाहून समर्थ आनंदमूर्तींना म्हणाले,"तुम्ही तर गुरुसेवेची अगदी परिसीमा केलीत, तुमची गुरुसेवा महान आहे"

असे म्हणून समर्थांनी आनंद मूर्तींची स्तुती करणारे दोन श्लोक रचले. आनंदमूर्ती अतिशय नम्रपणे म्हणाले,"मी या स्तुतीस पात्र नाही. आपण आणि रघुनाथस्वामी तुम्ही काही दोन नाहीत, एकच आहात." असे म्हणून आनंदमूर्तीनीदेखील समर्थांची स्तुति गाणारा एक श्लोक रचला. अशाप्रकारे

दोघांनीही एकमेकांना सन्मान दिला.

भोजन वगैरे आटोपून अध्यात्मिक चर्चा रंगल्या. चार दिवस तेथे राहून नंतर समर्थ वडगावी गेले. वडगावी जयराम स्वामींना भेटून ते चाफळकडे रवाना झाले.

शके १५९० मधली ही घटना आहे. त्यावेळी समर्थ, जयराम स्वामी, रंगनाथ स्वामी व आनंद मूर्ती काही दिवस बहे या गावी राहिले. त्या गावात ज्योतिबा नावाच्या एका भक्ताची विधवा म्हातारी राहत होती. तिच्या घरी या चौघांनी मुक्काम केला. ते चौघे कृष्णा नदीच्या मध्यभागी रोज सकाळी स्नानसंध्या करायला जात व भोजनासाठी म्हातारीच्या घरी येत. काही दिवस त्यांनी तेथेच वास्तव्य केले. त्या म्हातारीने एक म्हैस बाळगली होती. ती चांगलं दूध देत असे. एकदा म्हातारीने या चौघांना विनंती केली, की तुम्ही स्नानसंध्या करण्यासाठी कृष्णा नदीवर जाता तेव्हा माझी म्हैस आणि रेडकू यांना पण सोबत घेऊन जा. तुमची स्नान–संध्या होईपर्यंत ते हिरवळीवर चरतील आणि जेव्हा तुम्ही परत याल तेव्हा त्यांना घेऊन या. चौघांनी ही गोष्ट मान्य केली. त्याप्रमाणे दररोज ते म्हातारीची म्हैस व रेडकू कृष्णा नदीकाठी घेऊन जात व दुपारी घेऊन येत. एके दिवशी ही मंडळी स्नानसंध्या करण्यात गुंग असताना एका वाघाने म्हशीचे रेडकू उचलून नेले; परंतु याकडे चौघांचेही लक्ष नव्हते. स्नान आटोपून जेव्हा ते बाहेर आले, तेव्हा म्हशीसोबत रेडकू नसल्याचे पाहून त्यांनी इकडे तिकडे शोध घेतला. तेव्हा त्यांना एका झाडामागे कोणीतरी रेडकू मारुन टाकल्याचे दिसले. ते पाहून समर्थ रंगनाथ स्वामींना म्हणाले,"काय रंगोबा, काय केलंत तुम्ही? म्हातारीची लोणी भाकर खाल्ली आणि आज तिचं रेडकू मारुन खाल्लं? आता म्हातारीला काय सांगणार?" रंगनाथ स्वामी म्हणाले,"म्हातारी ची लोणी भाकर मी काही एकट्यानेच खाल्ली नाही. सगळ्यांनीच खाल्ली. तेव्हा त्याचा विचार सगळ्यांनी करावा."

म्हशीला घेऊन चौघेही घरी परतले. रेडकू नसल्याचे पाहून म्हातारीला अतिशय दुःख झाले आणि ती रडू लागली. रेडकू नसल्यामुळे म्हैसदेखील कासावीस झाली होतीय ती पण दूध देईनाशी झाली. तेव्हा म्हातारी सर्वांना निष्ठूरपणे म्हणाली,"अरे ,आजपर्यंत म्हातारीच्या घरचं दही दूध खाल्लं आणि आज म्हशीचं रेडकू मारलंत. आता ती दूध कसं देणार?"

हे ऐकून समर्थ पुढे होत म्हशीच्या पाठीवरुन प्रेमाने हात फिरवत म्हणाले,"बाई, हा मृत्यू जन्माला आलेल्या प्राण्याला घेऊन जाणारच. म्हणून वाईट वाटून न घेता म्हातारीला दुधाची धार नीट देत जा."

असे म्हणून त्यांनी म्हातारीला दूध काढायला सांगितले, म्हातारी दुध काढू लागली तेव्हा म्हशीने रोजच्यापेक्षा दुप्पट दूध दिले. हे पाहून म्हातारीने चौघांना साष्टांग नमस्कार घातला. पुढे म्हातारी जिवंत असेपर्यंत म्हैस असेच दूध देत राहिली.

क्रमशः

# किट्टी

चित्रांकन व लेखन :
अजय कालडा

आई, आज संध्याकाळी मी, बंटी आणि चानी चिंटूच्या घरी अभ्यासाला जाणार आहोत.
बरं, जा! पण अभ्यासच करा हं. नाहीतर खोड्या करत बसाल आणि अभ्यास तसाच राहील.
चिंटू, आम्ही आलो!

किट्टी, चल आपण अभ्यास करुया. कुणीही कुणाची खोडी काढायची नाही.
ए, मी बंटीची वही लपवतो, सांगू नकोस हं कुणाला! मज्जा येईल.
अरे बंटी, तू होमवर्कची वही नाही आणलीस ?
अरे, मी तर वही घेऊन आलो होतो, कुठं गेली बरं ?

अरे, शोधा, कुठं गेली वही ?
किट्टी ऽऽ, बाळ किती उशिर झाला! चल घरी लवकर.
अरे देवा! बंटीची खोडी काढण्यात मी माझा होमवर्कच विसरले.
आता मॅडमच्या हातचा प्रसाद खावा लागेल. शी! आपण उगाचच खोड्या काढण्यात वेळ घालवला. यापुढे असं कधीच वागायचं नाही!

# संत गोरा कुंभार

( इ.स. १२६७ ते १३१७)

महाराष्ट्रातील उस्मानाबाद जवळील तेरेढोकी गावात एक विठ्ठलभक्त राहत होता. त्यांचं नाव होतं गोरा कुंभार आणि त्यांच्या पत्नीचं नाव होतं संती. ते दोघही थोर भगवद्भक्त होते. प्रपंचात राहून भक्ती कशी करावी याचं उत्तम उदाहरण म्हणजे संत गोरा कुंभार. ते संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, चोखामेळा यांच्या समकालीन असल्याचे म्हटले जाते. सर्वांमध्ये ते वयाने थोर असल्यामुळे त्यांना सगळे प्रेमाने गोरोबाकाका असे म्हणत. एकदा ही सारी संत मंडळी त्यांच्या तेरेढोक या गावी जमली होती. तेव्हा संत ज्ञानेश्वरांच्या सांगण्यावरुन गोरोबाकाकांनी प्रत्येकाचे मडके कच्चे की पक्के हे थोपटून पाहिले, त्यात नामदेवांचे मडके कच्चे ठरले . खरं म्हणजे त्यांच्यामुळेच नामदेवांना सद्गुरूंची प्राप्ती झाली आणि विठ्ठलाच्या खऱ्या स्वरुपाचा बोध झाला.

संत गोरा कुंभार विठ्ठलभक्तीत इतके तल्लीन होत, की त्यांना देहभान उरत नसे. एकदा त्यांची पत्नी संती त्यांच्या लहान मुलाला त्यांच्याजवळ सांभाळायला देऊन पाणी भरायला गेली. गोरा कुंभार त्यावेळी मडके घडवण्यासाठी माती तुडवत होते. त्याच वेळी त्यांचे लहान मूल रांगत रांगत चिखलाजवळ आले; परंतु भगवत भजनामध्ये तल्लीन झालेल्या गोरोबांना काही समजले नाही. चिखल तुडवत असताना ते मूल त्यांच्या पायाखाली चिखलात तुडवले गेले. ज्यावेळी संती पाणी भरुन आली त्या वेळी मूल जवळ दिसले नाही. म्हणून ती त्यांना विचारायला गेली. तेव्हा चिखलामध्ये गतप्राण झालेले मूल पाहून तिने हंबरडा फोडला. गोरोबा

(पान ४४ वर)

# ऊन सावलीचा खेळ

एक श्रीमंत व्यापारी होता. त्याचा व्यापार धंदा अतिशय चांगला चालला होता. एकदा त्याला व्यापारात एवढा तोटा झाला, की त्याला त्याची सारी संपत्ती, घरदार विकावे लागले. कर्जाचा डोंगर वाढला होता. या परिस्थितीला कंटाळून त्याने स्वतःचे जीवन संपवण्याचा विचार केला. पावसाळ्याचे दिवस होते. शहरातील नदी दुथडी भरुन वाहत होती. दुःखी अंतःकरणाने मनाशी काहीतरी निश्चय करत व्यापारी नदीच्या दिशेने निघाला. एका उंच खडकावर जाऊन उडी मारणार तेवढ्यात त्याला दोन बळकट हातांनी पाठीमागून धरुन ठेवले. अंधारामध्ये विज चमकली. विजेच्या प्रकाशात त्याला पकडून ठेवणारी ती व्यक्ती दिसली. ती व्यक्ती होती स्वामी वेद प्रकाश. स्वामींनी व्यापाऱ्याला विचारले,“बंधो, असं काय घडलं ज्यामुळे ईश्वराने दिलेले हे अनमोल जीवन तुला संपवावे असे वाटते?” स्वामींच्या आपुलकीच्या शब्दांनी त्याला थोडा धीर आला आणि त्याने आपल्यावर ओढवलेले संकट स्वामींना सविस्तर कथन केले. स्वामी म्हणाले,“यावरही उपाय आहे, चल

माझ्यासोबत”

दुसऱ्या दिवशी स्वामी त्याला घेऊन एका गुहेत गेले. गुहेत पूर्ण अंधार होता. दोघेही सावकाश चाचपडत चालत होते. व्यापाऱ्याने विचारले,“स्वामीजी, पुढे तर काही दिसतच नाही. सर्वत्र अंधारच आहे; मग आपण का चालत आहोत?ष त्यावर स्वामीजी म्हणाले “या गुहेचं शेवटचं टोक कुठेतरी बाहेर पडण्याचा मार्ग दाखवेल तिथपर्यंत आपण चालत राहू या.” ते तसेच पुढे पुढे चालत राहिले. काही अंतरावर त्यांना छोटासा किरण दिसला. आणखी पुढे गेल्यावर त्यांना स्वच्छ प्रकाश दिसू लागला. बाहेर पडण्याचा मार्ग सापडला. स्वामीजी म्हणाले,“ज्यावेळी आपण गुहेत शिरलो, तेव्हा मिट्ट काळोख होता; परंतु तो काळोख कायम राहिला नाही. जसजसे आपण चालत राहिलो तसतसा काळोख दूर झाला. आपण पुन्हा उजेडात आलो तसं सुखानंतर दुःख येतं; पण दुःखही जास्त काळ टिकत नाही. जसं दिवसानंतर रात्र आणि रात्रीनंतर दिवस उगवतो, तसं दुःखानंतर पुन्हा सुखाचे दिवस येतात. हा निसर्गाचा नियमच आहे. त्यासाठी ईश्वराने दिलेले अनमोल जीवन संपवणं हा काही त्यावर उपाय नाही. जीवन हे ऊन सावलीचा खेळ आहे.

स्वामींच्या उपदेशाने व्यापाराच्या मनाला प्रसन्नता लाभली. त्याने पुन्हा नेटाने व्यापार करण्याचा निश्चय केला. तो स्वामींचा आशीर्वाद घेऊन घरी परतला. त्याने हळूहळू पुन्हा आपले गेलेले वैभव प्राप्त केले.

❖❖❖

# संत गोरा कुंभार

(पान ४२ वरुन)

काका तेव्हा भानावर आले. त्यांना आपल्या कृत्याचा खूप पश्चाताप झाला. असं म्हणतात, की त्यांनी त्याचे प्रायश्चित्त म्हणून आपले हात तोडून टाकले होते. त्यामुळे त्यांचा धंदा बसला; परंतु विठ्ठल रुक्मिणी त्यांच्या घरी मजुरी करु लागले. एके दिवशी सर्व संत मंडळी भजन करत असताना टाळ्या वाजवता वाजवता गोरोबाकाकांचे थोटे हात पुन्हा पूर्ववत झाले अशी आख्यायिका सांगितली जाते.

गोरोबा काका नित्यनेमाने सर्व संत मंडळींसोबत वारीला जात. त्यांच्या पत्नीने विठ्ठलाला कळवळून सांगितले, पांडुरंगा माझे मूल मला परत दे आणि आश्चर्य म्हणजे चिखलात तुडवले गेलेले ते मूल पांडुरंगाने त्यांना परत दिले. संतांच्या जीवनामध्ये अनेक चमत्कार घडत असले तरी चमत्कार हे त्यांच्या जीवनाचे ध्येय नव्हतं. कारण ते अद्वैतवादी संत होते. त्यांच्या अद्वैत साक्षात्काराची अनुभूती खालील अभंगांमध्ये येते, ते म्हणतात–

निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे।
'तव झालो प्रसंगी गुणातीत ।।

गोरोबा काका प्रपंचात असूनही विरक्त होते. अशा या थोर भगवद्भक्ताने १० एप्रिल १३१७ रोजी आपला नश्वर देह ठेवला. लातूर जवळील तेर या गावी त्यांची समाधी आहे.

❖❖❖

# सामान्य ज्ञान

1.) भारतातील सर्वात लहान राज्य कोणते?
अ)केरळ ब) सिक्कीम क) अरुणाचल प्रदेश ड) गोवा

2.) एवरेस्ट शिखरचे दुसरे नाव काय आहे?
अ ) सागरमाथा ब) कैलास शिखर क) बंदर पुच्छ ड) कांचनगंगा

3) युऑन हे कोणत्या देशाचे चलन आहे?
अ )जपान ब) चीन क)जर्मनी ड) फ्रान्स

4) इंग्लंडला भेट देणारी पहिली भारतीय व्यक्ती कोण?
अ)स्वामी विवेकानंद ब) राजा राममोहन राय क)दादाभाई नवरोजी ड) जमशेदजी टाटा

5) कोणत्या देशाने सर्वाधिक वेगवान संगणक तयार केला आहे?
अ)भारत ब) रशिया क) जपान ड) जर्मनी

6) दादासाहेब फाळके चित्रपट पुरस्कार सर्वप्रथम कोणाला मिळाला?
अ) देविकाराणी ब) नर्गिस क) श्यामा ड) नलिनी जयवंत

7) भारताची सुवर्णकन्या असे कोणास म्हटले गेले?
अ) ललिता बाबर ब) गीता साहू क) कविता राऊत ड) पी टी उषा

8) 'भारताचे मार्टिन ल्यूथर' असे कोणाला म्हटले जाते?
अ) महात्मा गांधी ब) ज्योतिबा फुले क) सरदार वल्लभभाई पटेल ड) आगरकर

9) देशातील सर्वाधिक उंचीवरील विमानतळ कोणत्या राज्यात आहे?
अ) अरुणाचल प्रदेश ब)मेघालय क ) हिमाचल प्रदेश ड) सिक्किम

10.) खालीलपैकी कोणती व्यक्तीरेखा रामायणातील नाही?
अ)शूर्पणखा ब) सुमित्रा क )तारा ड) भानुमती

उत्तरे इतरत्र

कथा

# चूक उमगली

खूप खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका छोट्याशा गावात रामराव नावाचा एक शेतकरी राहत होता. त्याला दोन मुलं होती. मोठा सदाशिव आणि धाकटा महादेव. रामरावांनी काबाडकष्ट करुन मुलांना वाढवले, शिक्षण दिले.

त्यांच्या दोन मुलांपैकी मोठा सदाशिव हा अतिशय आळशी होता. धाकटा महादेव मात्र आज्ञाधारक व प्रामाणिक होता. तो वडिलांच्या कामात हातभार लावत असे. सदाशिव मात्र गावभर भटकत राही. रामरावांनी त्याला अनेक वेळा समजावून सांगितलेय पण काही फायदा झाला नाही. शेवटी मृत्यूसमयी रामरावांनी दोघांनाही जवळ बोलावले आणि सांगितले,"बाळांनो, माझ्याकडे तुम्हाला द्यायला काही नाहीये. फक्त एक शेत आहे, एक गाय आहे आणि शेतात एक आंब्याचं झाड आहे. तुम्ही

आपसामध्ये समजूतदारपणे वाटून घ्या". महादेव म्हणाला,"हो बाबा! तुम्ही काही काळजी करु नका."

रामरावांच्या मृत्यूनंतर मोठ्या भावाने म्हणजे सदाशिवने महादेवला सांगितले,"आपण आता वाटणी करुन घेऊया. शेतामध्ये जे पीक येईल त्यात वरचा भाग माझा आणि खालचा भाग तुझा. तसेच गाईचा पुढचा भाग तुझा आणि मागचा भाग माझा. शेतामध्ये जे आंब्याचे झाड आहे त्यात वरचा भाग माझा आणि खालचा भाग तुझा." महादेव भोळा असल्याने त्याने या वाटणीला लगेच मंजुरी दिली.

पावसाळा सुरु झाला. सदाशिवने शेतात भात पेरला. भाताचे चांगले पीक आले. वरचा भाग म्हणजे भाताचे ओंब्या सदाशिवने घेतल्या आणि खाली असलेला कडबा महादेवला दिला. शेतात आंब्याचे झाड होते वरचा भाग म्हणजे झाडाला लागलेले आंबे सदाशिव घेतले. गाय दूध देऊ लागली गाईला चारा घालण्याचं, पाणी पाजण्याचं काम महादेव करी आणि मागचा भाग सदाशिवचा असल्याने सदाशिव मात्र तिचे दूध काढून घेई.

ही गोष्ट महादेवला खटकत होती, पण तो बिचारा शांत राहिला. त्याला आपल्या मोठ्या भावाचा कावा लक्षात आला. त्याने त्याला प्रेमाने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; परंतु सदाशिवने काही ऐकले नाही.

पुढच्या वर्षी महादेवने शेतामध्ये भुईमूग पेरला. भुईमुगाच्या सगळ्या शेंगा त्याने घेतल्या आणि सदाशिवला वरचा चारा दिला. त्यानंतर जेव्हा सदाशिव दूध काढायला जाई, तेव्हा महादेव गायीच्या तोंडावर फटके मारत असे. त्यामुळे गाय दूध देण्याऐवजी लाथा मारु लागली. परंतु सदाशिव काही बोलू शकत नव्हता; कारण पुढचा भाग महादेवचा होता.

उन्हाळ्यात आंब्याच्या झाडाला मोहोर आला. आता भरपूर आंबे लागतील या विचाराने सदाशिव खूष होता. महादेवने आंब्याच्या मुळाशी कु-हाडीने घाव घालायला सुरुवात केली. तेव्हा सदाशिव म्हणाला,"महादेवा! आता पुरे झालं, मी तुझ्याशी दुष्टपणाने वागलो. मला माझ्या कर्माची शिक्षा मिळाली. मला माझी चूक उमगली.आता यापुढे जे पीक येईल किंवा झाडाला जेवढे आंबे येतील ते आपण निम्मे–निम्मे वाटून घ्यायचे. गाईचे दूध देखील निम्मे–निम्मे वाटून घ्यायचे."

सदाशिवला आता उपरती प्राप्त झाली होती. महादेव म्हणाला,"दादा, मला क्षमा कर! मी तुझे डोळे उघडण्यासाठी मुद्दाम असे वागलो; परंतु यापुढे आपण खूप मेहनत करायची आणि जे उत्पन्न येईल अर्धे अर्धे वाटून घेऊ. अडीअडचणीला आपणच एकमेकाला आहोत. मग उगाचच बाहेरच्या लोकांना हस्तक्षेप करायला वाव का द्यायचा?"

सदाशिवला त्याचे म्हणणे पटले आणि दोघंही भाऊ शेवटपर्यंत गुण्यागोविंदाने नांदू लागले.

❖❖❖

# कॉमन कॉर्प

गोड्या पाण्यात जगात बहुतेक सर्वत्र आढळणारा हा मासा आहे. गोल्डफिश माशाशी त्याचे बरेच साम्य आढळते. हा मासा सायप्रिनिडी कुळातील आहे. आशिया आणि पूर्व युरोप ही त्याची मूळ स्थाने आहेत. जगातील काही भाग सोडला तर इतर ठिकाणच्या वातावरणात तो जगू शकतो. यांच्यातील एक जात ही मूळ चीन आणि जपान मधील आहे. या माशाची लांबी ५ फुटापर्यंत असून वजन ३७.३ कि. ग्रॅम इतके असते. याच्या अंगावर खवले असून डोळे मोठे असतात. याची आयुष्य मर्यादा ६५ वर्षापर्यंत असते. हा मासा कळपाने राहाणारा असून कमीत कमी पाच किंवा त्याहीपेक्षा जास्त अशा

कळपाने तो पाण्यात फिरत असतो. ३५ अंश ते ८५ अंश तापमानाच्या वातावरणात तो राहातो. कॉमन कॉर्प हा मासा बहुतेक करुन शाकाहारी आहे. पान वनस्पती, फंगस हे त्याचे खाद्य आहे. पण यातील काही जाती किडे आणि मृदूकाय प्राणी सुद्धा खातात. या माशांचे वैशिष्ट्य म्हणजे यांची मादी एका वेळेला तीन लाख अंडी घालते. हा मासा १८३१ मध्ये अमेरिकेतून सर्व जगभर आणला गेला. या माशाच्या विक्रीचा व्यवहार हा काही कोटी रुपयांचा आहे. कारण फूडफिश म्हणून याचा उपयोग सर्व ठिकाणी होतो

-संग्राहक : स्वप्निल वि.म्हाटवळ

# नेत्रसुखद रंगाचं बॅरोनेट

बॅरोनेट हे आपल्याकडे पावसाळ्यात आणि त्यानंतरच्या काळात दिसणारं फुलपाखरु. गर्द केशरी रंग ही त्याची खासियत आहे. या फुलपाखराचा आकार मध्यम असून, त्याच्या पंखांचा विस्तार हा साधारणतः ६० ते ७० मिलीमीटर एवढा असतो. याचे पुढच्या बाजूचे पंख गडद भगव्या रंगाचे असतात आणि त्यावर काळ्या रंगाची, वळणदार नक्षी असते. याच्या पंखाची खालची बाजूदेखील केशरी रंगाचीच असते; पण हा रंग काहीसा फिकट असतो. या पंखांवर अतिशय बारीक अशा काळ्या व लाल ठिपक्यांची नक्षी असते. तसंच या भागात पांढऱ्या रंगाचे दोन मोठे चट्टेसुध्दा असतात. या पंखांवर पांढऱ्या - निळसर रंगाची झळाळी असते, ज्यामुळे उन्हात उडताना हे पंख चमकदार दिसतात. या फुलपाखराच्या स्पृशा काळ्या रंगाच्या असतात व त्याची टोकं गडद पिवळ्या-केशरी रंगाची असतात. या प्रजातीतील नर व मादी दोघंही एकसारखेच दिसतात. मात्र, यांच्या रंगांमध्ये थोडासा फरक दिसून येतो.

पावसाळ्याच्या महिन्यांत जंगलातील पायवाटांवर हे फुलपाखरु हमखास आढळतं. हिरव्या झाडीतील ही केशरी रंगाची उधळण आपलं लक्ष वेधून घेते. हे फुलपाखरु चंचल असल्याने याचं छायाचित्रण करणं वा त्याच्या जवळ जाणं जरा कठीणच असतं. याला स्पर्श करण्याचा प्रयत्न केल्यास ते लगेच थोडंसं पुढे जाऊन बसतं. सकाळच्या कोवळ्या उन्हात ही फुलपाखरं जास्त उडताना दिसतात आणि एखाद्या फांदीच्या टोकावर बसून आजूबाजूला टेहाळणी करताना आढळतात. तसचं ही फुलपाखरं इतर फुलपाखरांना त्रास देत त्यांच्या पाठीमागे जलद उडत जातात व त्यांचा पाठलाग करुन त्यांना पळवून लावतात. आपल्या क्षेत्राचं रक्षण करण्यात ही फुलपाखरं पटाईत असतात.

या फुलपाखरांना चिखलपान अतिशय प्रिय असल्याने उन्हाळ्याच्या काळात कोरडे ओढे, नाले यांच्या आसपास ही मोठ्या संख्येने आढळतात. या फुलपाखरांचा केशरी रंगाचा समूह पाहणं अतिशय नेत्रसुखद असतं.

-संग्राहक : अंकित चं. जाधव

# रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१. ड
२. अ
३. ब
४. ब
५. क
६. अ
७. ड
८. ब
९. क
१०. ड

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ए | | | २व | डो | ३द | रा |
| ४को | ल्हा | पू | र | | धि | |
| ण | | | दा | | ५ची | ६न |
| ७ती | न | ८शे | न | ९ऊ | | ज |
| स | | वा | | १०स | ११ता | र |
| | १२ह | ळ | १३द | | प | |
| | ज | | १४म | ध | मा | शी |
| १५शि | र | ढो | ण | | पी | |

।। तू ही निरंकार ।।

गुरु ही सुमिरण गुरु ही पूजा गुरु ही पूजा का घर हे। गुरु ही है जगदीश्वर सन्तो और गुरु परमेश्वर है।
पाप विनाशक धर्म का रक्षक सतगुरु सच का पालक है। कष्ट निवारक पीडा नाशक सतगुरु जग का नायक है।
सच्चे मन से और लगन से जो सदगुरु को ध्यायेगा कहे 'हरदेव' वही जन जग में सकल पदारथ पायेगा।

शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

# महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही...
एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची
खास सोय !

अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

ऐ मन मेरे सुमिरण कर ले सुमिरण से सुख आयेगा। घेरेंगे न संकट तुझ को भवसागर तर जायेगा।
दम दम पल छिन नाम का जो जन करता अमृत पान है। ऐसे जन को जग में सन्तो मिलता जीवन दान है।

गुरुसिख है सन्तान गुरु की गुरु पिता गुरु माता है।
कहे 'हरदेव' कि एक अटूट ये शिष्य गुरु का नाता है।

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)
फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019-21
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

॥ तुही निरंकार ॥

जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

## मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स

मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक
इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड
(घेर ओरम टाईप डाईज)

## मे. राज इंडस्ट्रीज

मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल

## बाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन ह्. पाटील
अंचित ज. पाटील

राकेश च. पाटील
कुशल रा. पाटील